नि. फौ. ख. क्र. १६७/२०१८ मधील नि. क्र. ६९ वरील हुकुम

**(सी.एन.आर.नं.:- MHKO110014922018)**

**दिनांक १०/१२/२०१९**

१. अर्ज वाचला, सरकारी वकील यांनी दिलेले म्हणणे वाचले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले, संबंधीत पक्षकारचा युक्तिवाद ऐकला.

२. आरोपी क्र. ५ यांचे नमुद गन्ह्याकामी त्यांचे बँक ऑफ इंडिया शाखा कसबा बावडा येथील बचत खाते क्र. ०९०३१०११००००३०४ सिल करण्यात आले असून सदर खातेवर त्यांना दिनांक १४/०५/२०११ ते ३१/१०/२०१९ रोजी पर्यंतचा निर्वाह भत्ता रक्कम रुपये ४०,५११/- निर्वाह भत्ता जमा झालेबाबत कथन कलेले आहे. सदर भत्याचा व प्रस्तुत प्रकरणाशी काहीही संबंध नाही. त्यामुळे त्यांनी सदरची रक्कम त्यांना आदा करणेबाबत विनंती केली आहे.

३. सरकारी वकीलांनी सदर खातेवरील फक्त निर्वाह भत्ता देण्यात यावा व उर्वरीत रककम देण्यात येवू नये अशी हरकत घेतली आहे.

४. प्रस्तुत खटल्याचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याकामी पोलीसांतर्फे तपास पुर्ण होवून आरोपी क्र. १ ते ७ यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दिनांक १२/११/२०१८ रोजी भारतीय दंड संहिता कलम १८६० चे कलम ४०६, ४१६, ४२०, ४६७, ४६८, ४७२ सह ३४ अन्वये न्यायालयात दाखल झालेले आहे. सदर गुन्हयातील तपासादरम्यान आरोपी क्र. ५ याचे बँक ऑफ इंडिया शाखा कसबा बावडा ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर येथील खाते क्रमांक ०९०३१०११००००३०४ हे सिल करण्यात आले होते. अभियोग पक्षाने सदरचे खाते हे आरोपी क्र. ५ चे आहे याबद्दल कोणताही आक्षेप घेतलेला नाही. परंतू सरकारी वकीलांच्या कथनाप्रमाणे आरोपी क्र. ५ हा सरकारी नोकर असल्याने व त्यास उपजिविकेची कोणतेही साधन नसलयाने निर्वाह भत्ता देण्यास अभियोग पक्षातर्फे हरकत नसलयाचे कथन केले आहे. परंतू त्यांनी हे देखील कथन केले आहे की, सदरचे खाते सिल केल्यापसूनची पूर्वीची रक्कम देण्यात येवू नये. तरी प्रस्तुत गन्ह्याचे स्वरूप पाहता व आरोपी क्र. ५ यांची विनंती पाहता आरोपी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

आ दे श

१. अर्ज निशाणी क्र. ६९ मंजूर करण्यात येतो.

२. नियमित फौजदारी खटला क्र. १६७/२०१८ मध्ये जप्त करण्यात आलेले आरोपी क्र. ५ चे बँक ऑफ इंडिया खाते क्र. ०९०३१०११०००००३०४ मधील फक्त त्यांचा निर्वाह भत्ता रककम रुपये ४०,५११/- (रक्कम रुपये चाळीस हजार पाचशे आकरा फक्त) आरोपी क्र. ५ यांना देण्यात यावी.

३. आरोपी क्र. ५ यांचे बँक ऑफ इंडिया खाते क्र. ०९०३१०११०००००३०४ मधील खात्याबाबत जप्तीचा आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

Chaitanya Sunildatta Deshpande
Digitally signed by Chaitanya Sunildatta Deshpande
Date: 2019.12.11 13:39:29 +0530

**ता. १०/१२/२०१९.** **( सी. एस. देशपांडे )**

**पेठ–वडगांव.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ–वडगांव.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. R. P. Moraskar |
| Name of Court | Shri. C. S. Deshpande, Judicial Magistrate First Class, Peth-Vadgaon. |
| Date of Dictation | 10/12/2019 |
| Judgment Signed by the P.O. on | 10/12/2019 |
| Judgment uploaded on | 11/12/2019 |